# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 16/03/2015 (का.प.क्र.14) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिनांक 16 मार्च 2015 (का.प.क्र.14) रोजी मा.सभापती श्री.विजय वाघचौरे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला अति.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव श्री.एम.ए. पठाण तसेच संबधीत अधिकारी आणि खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
02. स.स.श्री.त्र्यबंक गणपतराव तुपे
03. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
04. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
05. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
06. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी
07. स.स.श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली
08. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
09. स.स.श्री.संजय सांडु चौधरी
10. स.स.श्री.जहांगीर खान अब्बास खान
11. स.स.सौ.प्रिती संतोष तोतला
12. स.स.सौ.सत्यभामा दामोधर शिंदे
13. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा

श्री.मीर हिदायत अली : शासनाकडून 10 रस्त्याच्या कामासाठी 24 कोटी मिळणार आहे. त्यात मॅनॉरिटी भागातील एकही रस्त्याचा समावेश नाही. मी आघाडी पक्षाच्या तर्फे शासनाचा निषेध करतो.20 वर्षापासून शिवसेना-भाजपाची सत्ता येथे असतांना दुसऱ्या विभागाच्या मार्फत निधी देऊन हे काम होणार आहे. याचा अर्थ महापालिकेवर शासनाचा भरवसा नाही यापुर्वी नावासहीत कधी पैसे आले नाही यामूळे शहरात चुकीचा मॅसेज जात आहे.

श्रीमती फिरदोस फातेमाखान:24 कोटी कोणत्या रस्त्यावर खर्च होणार नावासहीत आले.त्यातील काही रस्ते चांगले असतांना नाव आले.यात मॅनॉरिटी मुस्लीम भागातील एकाही रस्ता घेतला नाही.या भागाचा विकास होऊ नये हा हेतू ठेवून असे आले का जो शासनाचा निषेध केला त्यास अनुमोदन आहे.

श्री.त्रिंबक तुपे :नेमके कोणते रस्ते व कोणत्या भागातील आहे.कोणत्या विभागाकडून सर्वेक्षण झाले.

श्री.काशिनाथ कोकाटे :24 कोटी आले वृत्तपत्रात वाचले. यात ठराविक भागातीलच रस्ते घेतले का हे शहर एकच आहे छोटा रस्ता करण्याचे हाती घेतला असता तर समजू शकलो असतो परंतु जेंव्हा 15 30,18,25 मीटरचे रस्ते हाती घेतो तेंव्हा सार्वजनिक शहराचा विकास म्हणून बघितले जाते.शहरातील डीपी रस्ते कसे आहे त्याची गुणवत्ता काय,आजची परीस्थिती कशी आहे सौंदयीकरणाच्या माध्यमातून त्या रस्त्याने पर्यटक येतील चांगला मॅसेज जाईल.जे रस्ते घेतले ते कोणते सर्वे केंव्हा केला, सर्वसाधारण सभेची मंजूरी आहे का मंजूरीची गजर होती का? समिती नियुक्त केली त्यात मनपा आयुक्त सदस्य म्हणून नमुद केले बाकी नमूद नाही स्वायत्त

संस्थेवर शासनाचा विश्वास नाही का? आमच्यावर एक प्रकारचा अविश्वास शासनाने दाखवला. या रस्त्याची कामे केंव्हा होणार आहे अंदाजपत्रक केले का सर्व माहिती दयावी.

उपअभियंता(श्री.कुलकर्णी):9 मार्च 2015 रोजी शासनाने 24.33 कोटी 10 रस्त्यासाठी दिले.त्यात कैलासनगर ते एमजीएम हॉस्पीटल रोड,गजानन महाराज मंदीर चौक ते जयभवानीनगर रोड,कामगार चौक ते महालक्ष्मी चौक,टीव्ही सेन्टर ते बळीराम पाटील शाळा कॉर्नर,बाबा पेट्रोल पंप ते क्रांतीचौक,आझाद चौक ते बजरंग चौक, सेव्हनहिल ते सुतगिरणी चौक पीरबाजार ते शिवाजीनगर व्हाया एकताचौक, आकाशवाणी बीगबाजार चौक ते जवाहर कॉलनी चौक सेव्हनहिल ते चिश्तिया चौक मार्गे लोकमत च्या पाठीमागिल रस्ता असे रस्ते आहे या जीआर मध्ये शासनाने संबधीत विभागाचे विभागीय आयुक्त हे त्याचे अध्यक्ष असतील मा.जिल्हाधिकारी सदस्य सचिव, महापालिका आयुक्त हे सदस्य असतील हे काम कुणाकडे दयायचे व कार्यान्वित यंत्रणा कोण असेल निश्चित नव्हते 12 मार्च रोजी मा.विभागीय आयुक्त व महापालिका आयुक्त यांची बैठक झाली व कार्यान्वित यंत्रणा मनपा राहिल असे ठरले.

श्री.त्रिंबक तुपे :मुख्य रस्त्याचा यात समावेश येतो हे रस्ते कुठेणा कुठे जोडले आहे.रस्त्यावरील चौकाचा बेटाचा विकास व्हावा पर्यटक वाढले पाहिजे ही सर्वाची भावना आहे,यात जे रस्ते घेतले व त्यातील काहींची कामे चालू आहे. 24 कोटी मिळाले येणा-या काळात जे रस्ते करायचे राहतील त्यासाठी शासनाकडून निधी मागवावा. मा.पालकमंत्री, मा.खासदार व मा.आमदार यांचे माध्यमातून युती शासनाने या महापालिकेस मोठा निधी देण्याचे केले अर्धवट रस्त्याचे काम पुर्ण करावे शासनाने निधी दिला त्याबध्दल अभिनंदन करावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :लक्ष्मण चावडी ते एमजीएम डीपी रस्त्याची निविदा काढली काम होत नाही राममंदीर ते आझाद चौक रस्त्याचे काम झाले नाही या रस्त्याची अवस्था वाईट आहे सर्वाबरोबर अगोदर चर्चा केली असती तर हा रस्ता घेतला असता या शहराचा विकास व्हावा ही संकल्पना असते. शासनाचे अभिनंदन केले,योग्य आहे. येथील सत्ता एकहाती असतांना शासनाने अविश्वास का टाकला ही महापालिका सर्वांचींच आहे पालकाच्या भुमिकेप्रमाणे महापालिकेला सतत काम करावे लागते.

श्री.अनिल मकरिये :एकूण 50 कोटी शासनाने मंजूर केले 25 कोटी दिले बाकी एप्रिल मध्ये देणार आहे.

श्री.त्रिंबक तुपे :डिफर पेमेंन्टमध्ये राममंदीर रस्ता घेतलेला होता का ? असेल तर काम का थांबले आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :लक्ष्मण चावडी ते एमजीएम रस्त्याचे निविदा झालेली आहे का डिफरचे रस्ते आतापर्यत का होत नाही कोण कमी पडत आहे. बळीराम पाटील शाळा चिश्तिया चौकी पर्यतचा रस्ता 2009 ला डिफरवर चालू केला आतापर्यंत झाला नाही. जाणूनबूजून काम केले जात नाही का?

उपअभियंता(श्री.कुलकर्णी):रोषणगेट ते आझादचौक हा रस्ता 2010-11 मध्ये डिफर पेमेंन्टवर घेतलेला आहे दुभाजक व इतर कामे झाली आहे.

श्री.मीर हिदायत अली :या रस्त्यावर राममंदीर.येथे दुरवरचे लोक दर्शनासाठी येतात या रस्त्यावर मोठमोठे खड्डे तसेच धुळ मोठया प्रमाणात उडते नागरीकांना त्रास होतो 2010 पासून मी हा मुद्दा उपस्थित करतो परंतु प्रशासन टाळाटाळ करीत आहे.दुभाजकाचे काम होते

रस्त्याचे काम का होत नाही. मदनीचौक ते जकात नाका एक वर्षापुर्वी रस्ता केला परंतु तेथे आता 8-10 फुटावर खड्डे पडले.असे निष्कृष्ठ दर्जाचे काम होत असेल तर चौकशी करावी व संबधीत एजन्सीवर कार्यवाही व्हावी.

श्री.त्रिंबक तुपे :डिफरचे रस्त्याची कामे का थांबली या दहा रस्त्यात डिफरचे रस्ते आलेत का?

उपअभियंता(श्री कुलकर्णी ): सन 2012 ला रस्त्यांचे रूंदीकरण केले तेंव्हा 10-12 त्यात लक्ष्मणचावडी ते कैलास स्मशानभुमी पर्यंतचा रस्ता विशेष निधीतून होता स्मशानभुमी ते बसैय्येनगर श्री.वाहूळ यांचे घरापर्यंतचे 500 मी.लांब रस्त्याचे काम डिफरवर होते मंदीरापर्यतचे काम, पुलाचे काम केले पुढे 12 मालमत्ता मध्ये येतात ते हटविल्याशिवाय काम करता येत नाही.या निधीतून कैलासनगर ते एमजीएमपर्यत रस्त्याचे काम घेतले ठेकेदाराचे 22 कोटी देणे बाकी आहे त्यामूळे राममंदीर असलेल्या रस्त्याचे काम थांबले.

श्री.मीर हिदायत अली :डिफरवर हे काम होते पैसे देणे बाकी नाही मुदत संपत आली आहे.

उपअभियंता (श्री.कुलकर्णी): या कामाची मुदत संपली 31 मे पर्यत मुदत दिली.2010 मध्ये निविदा काढल्या 2011 मध्ये वर्क ऑर्डर दिली

श्री.काशिनाथ कोकाटे : दोन वर्षाची मुदत होती.2015 चालू आहे.40-30-30 अशा टप्प्याने पेमेंन्ट देणार होतो काम केले त्यानंतर तीन वर्ष पर्यंत रस्ता खराब झाला तर त्या ठेकेदारानी दुरूस्त करून दयावा लागतो त्याची मुदत केंव्हा पासून ग्राहय धरणार आहेत.

श्री.त्रिंबक तुपे :राममंदीर ते आझादचौक पर्यतचा तातडीने करण्याचे आदेशीत करावे.

उपअभियंता श्री.कुलकर्णी:काम पुर्ण केल्यापासून तीन वर्ष ग्राहय धरणार आहोत.मुदत दिली पेमेंन्ट दिल्यास काम सुरू होईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :बजरंग चौक ते बळीराम पाटील चौक रस्त्याचे 5 वर्षापासून काम होत नाही. राममंदीर रस्त्यातील बाजूच्या जागा भुसंपादीत केल्या त्या नागरीकांना मोबदलाही दिला रोषणगेट ते रामंदीर रोड त्यावेळी घेतला होता.मुदत संपेपर्यत काम होत नसेल तर योग्य नाही.किती मुदत देता येते. कोणाकडे किती अधिकार येतात एकच काम 10-10 वर्ष करता येते का अशी तरतूद आहे का सर्व माहिती दयावी.

श्री.अनिल जैस्वाल :बळीराम पाटील हायस्कूल ते बजरंग चौकापर्यतच्या रस्त्यावर खड्डे पडले 5 वर्षापासून काम पुर्ण होत नाही.

मा.सभापती :राममंदीर ते आझाद चौक रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे.रस्त्याचे काम पुर्ण झाल्यानंतर त्यापासून पुढील तीन वर्ष त्या रस्त्याची देखभाल दुरूस्तीचा कार्यकाळ पकडवा एजन्सी काम करण्यास तयार नसेल तर ब्लॅकलिस्ट करावे.

श्री.मीर हिदायत अली :मीलकॉर्नर ते ज्यूब्ली पार्क रस्त्यावर पॅचवर्क करावे.

मा.सभापती :रस्त्याचे कामासाठी 24.33 कोटी राज्य शासनाने दिले आहे.या रस्त्याची कामे तातडीने करावी.इतर रस्त्यासाठी शासनाकडे आणखी निधीची मागणी केली जाईल. शासनाने निधी दिला त्याबध्दल अभिंनदन करण्यात येते.

श्री.मीर हिदायत अली :महापालिका जुनी संस्था आहे शासनाने अविश्वास दाखविला या कामा बाबत इनचार्ज जिल्हाधिकारी आहे महापालिका आयुक्त सदस्य आहे. महापालिकेवर शासनाचा विश्वास नाही का?

श्री.त्रिंबक तुपे : टिळकनगर रविंद्रनगर भागात मनपाच्या दोन जागा आहे रविंद्रनगर येथील जागा मनपाने ताब्यात घेतली.त्यास लागूनच टिळकनगर येथे जागा आहे मा.न्यायालयात प्रकरण आहे असे समजते मनपाच्या माध्यमातून त्या जागेचे संरक्षण होत होते आता

कुणीतरी अतिक्रमण केले शेड उभारले व ती मोक्याची जागा बळकावण्याचा प्रयत्न होतो आहे ती जागा सुरक्षीत रहावी म्हणून सोसायटीतील जेष्ठ नागरीक मा.न्यायालयात त्या जागेची बाजू मांडतात पैसे खर्च करतात मनपाचे वकील तेथे हजर राहत नाही त्यामूळे ती जागा मनपाच्या ताब्यातून जाते की काय शंका येते.त्या जागेवर मनपाच्या नावाने पीआर कार्ड तयार करावे.कुणी अतिक्रमण करू नये त्या जागेची आजची परीस्थिती कशी आहे तेथील अतिक्रमण का काढले नाही.

प्रशासकीय अधिकारी :त्याजागेवर दोन रूमचे बांधकाम आहे संबधीतास नोटीस दिली प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मा.न्यायालयाचे त्या बाबतीत मनाई हुकूम नाही ते निष्कषित करता येईल या आठवडयात कार्यवाही केली जाईल.

श्री.त्रिंबक तुपे :मनपाच्या जागेचे संरक्षण करण्यात यावे.विधी विभागाचा अभिप्राय घ्यावा.कार्यवाही करावी.

प्रशासकीय अधिकारी :दोन दिवसात कार्यवाही केली जाईल.

अति.आयुक्त :सदर संचिका मागवून माहिती घेतली जाईल तात्काळ तेथील अतिक्रमण काढण्या बाबत सुचना दिल्या जातील.

श्री.काशिनाथ कोकाटे :मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालयाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक देणार होते.माजी सैनिक की सुरक्षा रक्षक किंवा कॅजवल कर्मचारी नेमले आहेत का? माजी सैनिक यांचे वेतनश्रेणीचा संचिका प्रलंबीत का आहे.काही कर्मचारी याबाबतीत मा.न्यायालयात दाद मागण्यासाठी गेले होते त्यांचा प्रश्न निकाली काढावा मागिल बैठकीत आदेश केले होते ते कर्मचारी मा. कोर्टात गेले म्हणून ती सचिंका प्रलंबीत ठेवली का ?ती संचिका अति.आयुक्ताकडे आली का ? तसेच पाणीपुरवठा विभागातील काही कर्मचारी यांना जास्तीची एक वेतनवाढ देण्याचे आदेशीत केले होते ती कार्यवाही कुठपर्यत आली.

श्री.त्रिंबक तुपे :मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय येथे कर्मचारी दिले का या वास्तुचे जतन करणे मनपाचे कर्तव्य आहे.

आस्थापना अधिकारी-2 :तीन कर्मचारी दिले त्यात दोन सफाई मजूर व एक शिपाई आहे.

अति.आयुक्त :1 वरिष्ठ लिपीक, 1 क.लिपीक 3 सुरक्षा रक्षक इतर कर्मचारी असे 10 कर्मचारी दिले यापुढे तेथे भेटी देणारे पर्यटकांची संख्या वाढणार आहे सध्या निवडणुकीसाठी कर्मचारी गेलेले आहे.आणखी कर्मचारी देण्याबाबत कार्यवाही केली जाईल.

श्री.त्रिंबक तुपे : वस्तूला कुणी हात लावणार नाही तेथे बॅरीकेट लावावे विटंबना होणार नाही दक्षता घ्यावी.

अति.आयुक्त :सुरक्षा रक्षकाना जास्तीची वेतनश्रेणी मिळाली याची संचिका घेऊन शासनाकडे जाऊन चर्चा केली.पोलीस कॉन्स्टेबल यांना जी वेतनश्रेणी मिळते ती मिळावी अशी सुरक्षा रक्षकाची मागणी होती संबधीत विभागाचे असे म्हणणे आहे की दोघाच्या सेवेत फरक आहे वाढीव वेतनश्रेणी देता येणार नाही. पुन्हा प्रेझेन्टेशन घेऊन कार्यवाही करता येईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :इतर मनपामध्ये जी वेतनश्रेणी दिली जाते ती दयावी अशी त्याची मागणी आहे.जेव्हा सुरक्षा रक्षक निवृत्त होतात त्यांचे शेवटच्या महिण्यात जे पेमेंन्ट असते त्यावर पेन्शन लागू होते. वाढीव वेतनश्रेणी नुसार पेन्शन काढले जात नाही.

श्री.मीर हिदायत अली :सिटीचौक भागात नाल्यावरील ब्रीजचे काम चार पोल मध्ये येत असल्याने बंद पडले. जीटीएल कडे पैसे जमा केले असतांना काम का सुरू होत नाही.

उपअभियंता(विदयुत) :काम सुरू करण्यासाठी महावितरण कंपनीला सांगण्यात आले सोमवार पासून काम सुरू करणार आहे.

श्री.मीर हिदायत अली :पोल पडण्याच्या मार्गावर आहे बाजूला शाळा आहे विदयार्थी जा ये करतात मानहाणी झाल्यास कोण जबाबदार असणार आहे.

उपअभियंता-विदयुत :पोल शिप्ट करण्या संदर्भात पैसे भरणा केले पर्सनली मी जाऊन कंपनीला सांगण्यात येईल.

मा.सभापती :पोल शिप्ट करण्याची कार्यवाही तातडीने करावे.

श्रीमती प्रिती तोतला :सुपारी हनुमान रोडवरील सिक्सेटपोल लाईट सहित पडला,अजुनही पाऊस वारा आल्यास दोन पोल पडण्याच्या स्थितीत आहे.वेळीच कार्यवाही करावी.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :वृत्तपत्रात बातम्या येतात महापालिकेचा खोटारडेपणा, न्याय प्रकरणातही चुकीची माहिती सादर केली जात आहे यामूळे महापालिकेची प्रत्येक कामाच्या बाबतीत बदनामी होत आहे.

श्री.अनिल जैस्वाल :पोलीस मेस ते बळीराम पाटील चौक व पुढे डॉ.आंबेडकर चौकाचे व्हाईट टॅपींगच्या रस्त्याच्या कामाचे एक वर्षापुर्वी टेंडर झाले. बाजूलाच मार्केट कमेटी आहे जिल्हयातून अनेक शेतकरी रस्त्याने ये-जा या रस्त्याचे काम केव्हा करणार आहे.

कार्य.अभियंता-(श्री.सिद्दीकी अफसर) :जो मुद्दा मांडला तो बरोबर आहे.एक वर्षापासून हे काम थांबले व्हा.टॅपींग च्या प्रथम टप्प्यातील या कामाचा समावेश आहे.ठेकेदाराने कामास सुरूवात केली होती आता काम बंद आहे त्यांना नोटीस दिली परंतु पेमेंन्ट देण्याची मागणी केली.

श्री.अनिल जैस्वाल :अर्धवट कामाचे बील दिले जाते जेथे खड्डे पडले ते काम होत नाही.

मा.सभापती :तातडीने या रस्त्याचे काम सुरू करावे

श्री.अनिल जैस्वाल :डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये मोठया प्रमाणात ट्राफिक जाम होत असे तेथे अनेक वेळा अपघात झाले.त्या ठिकाणी वाहतूक सिग्नल बसविण्या बाबत उदघाटन केले त्याबध्दल विदयुत विभागाचे संबधीत अधिकारी यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करावे.

सौ.सत्यभामा शिंदे :उड्डाण पुलाचे कामे होत आहे परंतु बाजूचे सर्व्हीस रोडचे कामे ही तातडीने करावी नागरीकांना पायी सुध्दा चालता येत नाही अशी परीस्थिती निर्माण झाली.

कार्य.अभियंता(श्री.सिकंदर अली)पुलाच्या साईडचे सर्व्हीस रोडचे कामे एमएसआरडीसी करणार आहे.सदर कामे सुरू आहे.

श्री.त्रिंबक तुपे :मोढांनाका सिंधी कॉलनी ते बालाजीनगर रस्त्याचे काम झालेले नाही सिंधी समाजाचे तसेच व्यापारी लोक तेथे जास्त राहतात.21 तारखेला सिंधी समाजाचे गुरू झुलेलालजी महाराज यांची जयंती आहे मोठा रॅली काढून उत्सव साजरा होणार आहे आज रोजी त्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले धार्मीक कार्यक्रम असल्यामूळे या रस्त्यावरील पॅचवर्क चे काम करावे.

मा.सभापती : 02 दिवसाच्या आत या रस्त्यावरील पॅचवर्क करण्यात यावे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :खिवंसरा पार्क येथे संतसृष्टी चे प्रपोजल आहे त्या जागेवर घाण पडलेली होती नागरीकांनी स्वच्छता केली मा.आमदार श्री.सिरसाट संजय यांनी तेथे कामाचे उदघाटन केले व येथील कामासाठी 50 लक्ष डीपीडीसीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले जाईल.आश्वासन दिले.तेथील रस्त्याचे काम केंव्हा होणार आहे.

श्री.मीर हिदायत अली : मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आहेत की पब्लीक प्लेस वर धार्मीक स्थळ करू शकत नाही. संतसृष्टी प्रोजेक्ट तेथे राबवू शकतो का?

कार्य.अभि.(श्री.सिकंदर अली):संतसृष्टी संदर्भात प्रशासकीय मान्यता मिळाली त्याचे कार्याध्येश ही दिले एक दिवसा अगोदर मा.आमदार श्री.संजयजी शिरसाट आलेले होते. ते डीपीडीसीचे सदस्य सुध्दा आहे. आर्थीक प्रपोजल जे फंडस रिलिज करायचे ते त्यांचे मार्फत होत आहे 50 लक्ष या प्रोजेक्टसाठी डीपीडीसीच्या फंडातून देणार असे त्यांनी आश्वासन दिले.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :तेथील नाला व कपांऊडचे काम प्रथम सुरू करावे.

श्री.मीर हिदायत अली :त्या जागेवर संतसृष्टी प्रोजेक्ट करू शकतो का विधी सल्लागार यांचा खुलासा घ्यावा.

कार्य.अभियंता(श्री.सिकदंर अली):डीपी रिझर्वेशन प्रमाणे काम होईल.जे काम ते करीत आहे ते अनुज्ञेय आहे.

श्रीमती सत्यभामा शिंदे :माझ्या वार्डात औषध फवारणी होत नाही.फक्त ॲबेट फवारणी होते.फवारणीचे काम पुर्ण शहरात बंद आहे .ठोबरे एजन्सीकडून काम बंद केले.असे समजते हे सत्य आहे का?

श्री.काशिनाथ कोकाटे :संतसृष्टी प्रोजेक्ट करीता डीपी प्लॅनमध्ये काय अनुज्ञेय आहे.

श्री.मीर हिदायत अली :मा.सर्वौच्च न्यायालयाचे निर्देशानुसार ती पब्लीक प्लेस आहे तेथे काम करू शकतो का?

कार्य.अभियंता(श्री.सिकदंर अली) : काम करतांना सर्व बघून कार्यवाही केली जाईल.

मा.सभापती :या ठिकाणी नाला आहे त्या नाल्याचे अंडर ग्राऊडचे काम भुमीगत गटार च्या माध्यमातून करावे संरक्षीत भिंतीचे काम करावे मा.आमदार श्री.संजयजी सिरसाट साहेब यांनी डीपीडीसीच्या माध्यमातून 50 लक्ष देण्याचे आश्वासन दिले त्यानुसार कार्यवाही करावी.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :स्वाईन फ्ल्यूची साथ चालू आहे.या विषयी कोणते औषधोपचार महापालिकेच्या माध्यमातून होत आहे या आजाराचे अनेक पेशंन्ट आढळून येत आहे.

श्रीमती फिरदोस फातेमा खान:मागिल बैठकीत या संदर्भात नागरीकामध्ये जणजागृण करणे, पॉम्प्लेट वाटप करणे जनतेपर्यत माहिती जाईल अशी कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते काय कार्यवाही केली.

आरोग्य वैद्यकीय अधि. :यासंदर्भात घरोघरी जाऊन पल्स पोलीओच्या धतीवर जणजागृण केले महापालिकेच्या वतीने 6 मायकींग रिक्षा फिरवल्या, ज्या भागात या आजाराचे रूग्ण आहे, मृत्यू झाले अशा भागात जाऊन 16 हजार घराचा सर्वे तसेच मस्जीद मंदीर मध्ये अलाऊन्समेंन्ट केले शासनाच्या मार्गदर्शनानुसार घाटी रूग्णालय येथे सॉप्ट घेणेसाठी प्रयोगशाळेला मान्यता दिली.व त्यानुसार त्या आजारासाठी ते रूग्ण त्या दवाखान्यात ॲडमिट होतील.शासनाचे नियम नुसार कार्यवाही करावी लागते ती कार्यवाही केली उपसंचालक आरोग्य विभाग याची दररोज व्हिजीट होते मनपाच्या वतीने जणजागृण केले जात आहे. शासनाने याविषयी समाधान व्यक्त केले या आजारासाठी गोळयाचा स्टॉक उपलब्ध आहे खाजगी दवाखान्यात पण उपलब्ध केला आहे.

श्री.त्रिंबक तुपे :शिवशंकर कॉलनी येथील एक रूग्ण डॉ.हेगडेवार रूग्णालयात ॲडमीट होण्यासाठी गेले येथे सुविधा नाही असे सांगून ॲडमीट करून घेतले नाही बजाज हॉस्पीटलला सुध्दा ॲडमीट करून घेत नाही या दोन्ही हॉस्पीटलला सुचना कराव्यात की रूग्णांना ॲडमीट करून घ्यावे.तशा सुचना आरोग्य अधिकारी यांनी त्यांना द्याव्यात.

| | |
|---|---|
| श्री.सुरेंद्र कुलकर्णी | :कोटला कॉलनी येथील दवाखान्यात एका व्यक्तीची डेथ झाली मनपाचे कुणीही तेथे गेले नाही. |
| आरोग्य वैद्य.अधिकारी | :आता शासनाची पॉलीसी बदलली पुर्वी कॉन्टेक्ट रूग्ण असल्यास त्यांना लगेच औषधोपचार सुरू करीत असे आता शासनाच्या निर्देशानुसार 10 दिवस तपासणी करुन जर त्या आजाराची लक्षणे दिसून आली तरच पुढील औषधोपचार चालू करावे असे शासनाचे गाईडलाईन्स आहे.जानेवारी पासून 8 हजार रूग्णांची तपासणी करण्यात आली त्यात 44 रूग्ण संशयीत व 32 पॉझीटीव्ह होते 8 रूग्ण बरे होऊन घरी गेले. त्यामूळे परीस्थीती गंभीर आहे असे नाही. |
| श्री.मीर हिदायत अली | :मोंढा नाका येथील सलीम टी हाऊस चे मालक यांचे पत्नीला बजाज हॉस्पीटलमध्ये ॲडमीट केले होते तब्बेत जास्त झाल्याने त्या हॉस्पीटल व्यवस्थाकाने त्यांना ऐनवेळी घाटीत शिप्ट करण्यात सुचना दिल्या त्या महिलेचा रात्री 11 वा.मृत्यु झाला. वेळेवर दुस-या दवाखान्यात शिप्ट करणे योग्य नाही अशा दवाखान्यास ताकीद दयावी. |
| आरोग्य वैद्य.अधिकारी | :खाजगी दवाखान्यात सुध्दा 50 बेड असेल तर 2 टक्के बेड या आजाराच्या रूग्णासाठी राखीव असावे असे शासनाचे निर्देश आहे.अशा दवाखान्यास नोटीस देऊन कार्यवाही केली जाईल. |
| श्री.जगदीश सिध्द | :हा आजार होऊ नये यासाठी जनतेमध्ये जनजागृण केले कोणते पॉम्प्लेट वाटत केले दाखवावे. |
| मा.सभापती | :सदस्यांना त्याची प्रत दयावी. तसेच खाजगी रूग्णालयात 2 टक्के बेड हे या आजारासाठी राखीव असावे तसे सुचना त्या दवाखान्यास देण्यात यावे. |
| श्री.अनिल जैस्वाल | :मोकाट कुत्र्यांची संख्या वाढलेली आहे दोन मुलांना कुत्र्याचे चावले त्यांचा बदोबस्त करावा. |
| मा.सभापती | : मोकाट कुत्र्यांचा बदोबस्त ताबडतोब करावा. |

**विषय क्र. 140 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.11 अंतर्गत विविध रस्त्याचे कॉंक्रीटींग/ व्हाईट टॉपींग करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.39,81,117/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती विषय क्र.98, दिनांक 29/01/2015 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. मान्यतेनुसार सदरील कामाकरीता निविदा मागविण्यात आली असता ई-टेंडर विभागाच्या अहवालानुसार एकूण 03 को-या निविदा विक्री झाल्या व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील तीनही निविदा दर भरून प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | सहारा कन्स्ट्रक्शन | - | 10.01 % कमी दराने |
| 02. | श्री.एम.ए.सिद्दीकी | - | 7.87 % कमी दराने |
| 03. | अमन असोसिएटस् | - | 12 % जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.01% कमी दराची सहारा कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

तरी सदरील काम सहारा कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.01% कमी दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.11 अंतर्गत विविध रस्त्याचे कॉंक्रीटींग/ व्हाईट टॉपींग करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक सहारा कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.01% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 141 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे गारखेडा परिसरातील जवाहर कॉलनी प्रभागातील माणिक हॉस्पीटल समोरील शास्त्रीनगर जवळील महानगरपालिकेचे सभागृह सचिव युवा प्रतिष्ठाण संचलित फिटनेस पॉंईट हेल्थ क्लब यांनी भाडेतत्वावर मिळणे संबंधाने मागणी केलेली आहे. त्यानुषंगाने सदरील सभागृहाचे क्षेत्रफळ 125.06 चौ.मी. एवढे असून त्यासाठी चालु वर्षाच्या शिध्द शिघ्र गणकानुसार प्रतिमाह रू.36,841/- प्रमाणे भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव तसेच यापूर्वी मा.सर्वसाधारण सभा दि.15/11/2011 रोजीच्या सभेमधील विषय क्र.514 अन्वये फिटनेस पॉंईट हेल्थ क्लब यांना धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक व इतर कार्यासाठी माफक भाडेतत्वावर व देखभाल दुरूस्ती ते करतील या अटीवर नियमानुसार भाडेतत्वावर देण्यास मंजुरी दिलेली आहे.

तथापी सदरील सभागृह भाडेतत्वावर देणेसाठी सन 2015 च्या शिध्द शिघ्र गणकानुसार प्रतिमाह रू.36,841/- प्रमाणे देणेसाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.सुरेंद्र कुलकर्णी : माझ्या वॉर्डात हा हॉल आहे. आतमध्ये भंगार झालेला आहे. लोकांना उपयोगी व्हावे म्हणून मा.न्यायालयातून मनपास परत मिळविण्यासाठी प्रयत्न केले. आमदार निधीतून बांधण्यात आलेला आहे. सदर हॉल कमर्शियल नाही. अंतर्गत रस्त्यावर आहे. नाममात्र दराने नियमानुसार भाडेतत्वावर देण्यांत यावे.

मा.सभापती : स.सदस्य सुरेंद्र कुलकर्णी यांनी सभागृहात निवेदन केल्याप्रमाणे कमर्शियल नाही. अंतर्गत रस्त्यावर असून आमदार निधीतून मनपास मिळालेले आहे. दरमहा रू.2000/- प्रमाणे द्यावे. दुरूस्तीसह मंजुर करण्यात येतो.इतर ऐनवेळचे विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.सर्वसाधारण सभा दिनांक 15/11/2011 रोजीच्या सभेमधील ठराव क्र.514 अन्वये शास्त्रीनगर जवळील महानगरपालिकेचे सभागृह फिटनेस पॉंईट हेल्थ क्लब यांना धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक व इतर कार्यासाठी माफक भाडेतत्वावर व देखभाल दुरूस्ती संबंधीताने करावी या अटीवर भाडेतत्वावर देण्यास मान्यता झाली असल्याने सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मौजे गारखेडा परिसरातील जवाहर कॉलनी प्रभागातील माणिक हॉस्पीटल समोरील शास्त्रीनगर जवळील महानगरपालिकेचे अंतर्गत रस्त्यावर असलेले सभागृह सचिव युवा प्रतिष्ठाण संचलित फिटनेस पॉंईट हेल्थ क्लब यांना दरमहा रूपये 2000/- प्रमाणे देण्यास दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 142 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.44 किराडपुरा येथील किराडपुरा चौक ते पाणी का बंबा नाल्यापर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे करीता सा. बां. विभागाच्या सन 2013-14 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.2945005/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदरील कामाचा खर्च सन 2013-14 अंतर्गत करण्यात येईल.सदर अंदाजपत्रकाच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीने ठराव क्रमांक 88 दिनांक 22/01/2015 अन्वये मान्यता दिलेली असुन सदरील कामाचा खर्च विकास योजने अंतर्गत विविध विकास कामे करणे या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध तरतुदीनुसार करण्यात येईल. त्यानुसार ई निविदा विभागामार्फत निविदा

मागविण्यात आल्या असता एकुण 3 निविदा दर भरून प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नाव | निविदा दर |
|---|---|---|
| 01 | सिद्दीकी जलीसोद्दीन | 7.87 % कमी दराने |
| 02 | गाजी मो.अथोरोद्दीन | 1.01 % जास्त दराने |
| 03 | शेख सलीम मोहीयोद्दीन | 1.15 % जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.87 % कमी दराची निविदा सिद्दीकी जलीसोद्दीन यांची प्राप्त झाली आहे. तथापी मा.आयुक्त महोदय यांनी 7.87 % कमी ऐवजी 8% कमी दराने प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली असुन सदरील प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

त्यानुसार जलीसोद्दीन सिद्दीकी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.87 % कमी ऐवजी 8% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.44 किराडपुरा येथील किराडपुरा चौक ते पाणी का बंबा नाल्यापर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे करीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक जलीसोद्दीन सिद्दीकी यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 08% कमी (आठ टक्के कमी दराने) दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**(महबूबखॉं पठाण)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद